माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००००७६

**अपिलार्थी श्री. मनिष बालकृष्ण जोशी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा हुजुर रेकॉर्ड किपर**
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत.
१० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर तहसिलदार (महसूल)**
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत.
१० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०५.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.०८.२०२३ | ०८.०९.२०२३ | २१.०९.२०२३ | २२.११.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.१२.२०२३ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०८.०९.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.११.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०७.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार गोळीबार सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्याशी संबंधीत सुट क्र. १२८/१९६८ विषयी माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी तथा हूजूर रेकॉर्ड किपर यांनी दि. ०८.०९.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, आपण मागणी केलेली संचिकाचे शोध कार्य चालू आहे. सदर संचिका प्राप्त होताच आपणास पत्राव्दारे कळविण्यात येईल. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २१.०९.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.११.२०२३ रोजी संचिका उपलब्ध नसल्याबाबत कळविले असल्याने अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा हुजूर रेकॉर्ड किपर, मुंबई उपनगर उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०५.२०२५ रोजीचे पत्र सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींना कळविले होते की, आपण दि. १९.०५.२०२५ रोजी कार्यालयात उपस्थित राहिले असता

..२/-

आपणास आवश्यक असलेल्या माहितीच्या अनुषंगाने सदर संचिकेचे निरीक्षण केले असता सदर संचिकेत आपणास हवी असलेली माहिती त्यात नसल्याचे कळविले. सबब आपणास हवी असलेली माहिती अभिलेखात उपलब्ध नाही.

तसेच, जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे लेखी निवेदन दि.२२.०५.२०२५ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचेसमोर सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, कार्यासन ५ मुंबई उपनगर जिल्हा उपस्थित होते. व्दितीय अपील सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा हुजूर रेकॉर्ड किपर मुंबई उपनगर उपस्थित आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगासमोर स्पष्ट करु शकले नाही की, सदर अभिलेख जतन करण्याचा कालावधी काय आहे. परंतु, अभिलेखावरुन निदर्शनास येते की, सदर अभिलेख कायमस्वरुपी जतन करण्यासारखा आहे.

सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, कार्यासन ५ मुंबई उपनगर जिल्हा व जन माहिती अधिकारी तथा हुजूर रेकॉर्ड किपर मुंबई उपनगर यांची उपस्थिती आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तथा हुजूर रेकॉर्ड किपर मुंबई उपनगर यांनी अपिलार्थीनी मागणी केलेला अभिलेख उपलब्ध होत नसेल महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करुन शपथपत्रावर नमुद करुन पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०१.०७.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

(State Information Commission, Greater Mumbai — seal)

26-5-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २६.०५.२०२५**

प्रत: जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, कार्यासन ५ मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.

# अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००७६
# अपिलार्थीश्री. मनिष बालकृष्ण जोशी
# सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५ (In continuation of order dt २६.०५.२०२५)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी तथाअव्वल कारकून, कार्यासन ५मुंबई उपनगर जिल्हा व जन माहिती अधिकारी तथा हुजूर रेकॉर्ड किपर मुंबई उपनगर यांची उपस्थिती आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तथा हुजूर रेकॉर्ड किपर मुंबई उपनगर यांनी अपिलार्थीनी मागणी केलेला अभिलेख उपलब्ध होत नसेल महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करुन शपथपत्रावर नमुद करुन पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी साध्या पत्रावर शपथपत्र सादर करुन नमुद केले की, प्रथम सुनावणी, व्दितीय सुनावणीच्या दरम्यान सदर अपुऱ्या माहितीच्या अनुषंगाने संचिकेचे वारंवार तपास घेण्यात आला. गोळीबार को. ऑ. हौ. सोसायटी आधारे एक संचिका सापडली तसे अपिलार्थी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात तात्काळ बोलावुन सदर संचिका दि. १९.०५.२०२५ रोजी दाखविण्यात आली. सदर संचिकेचे अपिलार्थी यांनी पुर्ण संचिका तपासली असता संचिका त्यांनी मागितलेल्या माहितीशी निगडीत नसल्याचे कळविले. या कार्यालयास उपलब्ध असलेली माहिती / संचिका अपिलार्थी यांना तपासणीस दिली होती. हुजूर रेकॉर्ड किपर, मुंबई उपनगर जिल्हा यांनी जाणीवपुर्वक कोणतीही माहिती लपविलेली नाही. अपिलार्थी यांना सदर दाव्याची प्रत त्यातील शपथपत्र, न्यायालयीन आदेश संबंधित न्यायालयातुन ही प्राप्त होऊ शकतात. तरीही अपिलार्थी यांच्या अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या संचिका वारंवार शोधल्या, उपलब्ध संचिकेचे अपिलार्थी यांनी तपासणी केली आहे. परंतु अपिलार्थी यांनी मागितलेली दाव्याची प्रत वर उल्लेखिलेल्या अपुऱ्या तपशिलामुळे आढळुन येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या शपथपत्राची प्रत अपिलार्थीना उपलब्ध करुन दिली व अपिलार्थी यांनी ती स्विकारली.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना उत्तर दिलेले आहे. सबब आयोगपुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२५**

2-7-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**